# जैन धर्म

श्रेणिक सुरेश सरडे




परस्परोपग्रहो जीवानाम्

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# जैन धर्म

संकलन : श्रेणिक सुरेश सरडे

# मित्रांनो!

# जैन धर्म

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जैन धर्म

लेखन व संकलन: श्रेणिक सुरेश सरडे

पत्ता : कवठे पिराण, तालुका : मिरज , जिल्हा : सांगली (४१६४१७)

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप 9011464838

ई मेल -- shreniks2k7@rediffmail.com

छायाचित्रे व इतर माहित्ती इंटरनेटवरून घेतली आहे. सौजन्य: गुगल, विश्वकोष. विकीपिडिया

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्या त्या लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ नोव्हेंबर २०२० (महावीर जैन संवत २५४७ आरंभ)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



मी श्रेणिक सुरेश सरडे,

इंजिनिरीग कॉलेज मध्ये प्राध्यापक आहे .

या पुस्तकामध्ये जैन धर्मा विषयी थोडक्यात माहिति दिली आहे . जैन धर्मा विषयी सर्वांना माहिती व्हावी हा यामागचा उद्देश आहे . या पुस्तका मध्ये जैन धर्म व चोविस तिर्थंकराविषयी थोडकयात माहिती दिली आहे . हे पुस्तक लिहताना माझे वडिल व आई यांची मला मदत झाली . ईसाहित्य मध्ये माझे भयाण रात्र हे पुस्तक प्रकाशित झाले आहे .

# १. जैन धर्माची माहिती

**जैन धर्म चा अर्थ ः**

“जैन धर्म ” हा भारतातील फार प्राचीन, जुन्या धर्मांपैकी एक आहे.जैन शब्द ‘**जिन**’ हा शब्दापासून बनलेला आहे. **जिन** म्हणजे जिंकणे किंवा जिंकणारा. ज्याने स्वतःचा इद्रिंया वर म्हणजे स्वतःवर विजय मिळवला तो. ज्यांने स्वतःचा मनावर, वाणीवर, कामावर विजय मिळवला तो,म्हणजे ‘**जिन**’.

**अ)** “जगा व जगू द्या”, ही शिकवण प्रामुख्याने जैन धर्म देतो.

“जगा व जगू द्या” चा अर्थ ः

१. कोणालाही त्रास द्यायचा नाही.

२. सगळांचे कल्याण करणे.

३. कोणाच्या स्वातंत्रावर गदा आणू नये.

वरच्या तीन शिकवण प्रामुख्याने जैन धर्म देतो.

जैन समजातील लोक मानतात की, सर्व जीवांमध्ये आत्मा असतो व सर्व जीवांना समान वागणूक व मान मिळाला पाहिजे.

**ब)** जैन धर्म ची तत्वे :

१. अहिंसा.

२. मालमत्तेचा लोभ न करणे.

३. चोरी न करणे.

४. भोगवादी न होणे.

५. श्रध्दा, ज्ञान , योग्य वर्तणुक.

**क) जैन धर्मा चे त्रिरत्न :**

१. सम्यक दर्शन

२. सम्यक ज्ञान

३. सम्यक आचरण

## ड) पंचमहाव्रते

१. सत्य ः सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे.

२. अहिंसा ः अहिंसा म्हणजे जीवांची हत्या करू नये.

३. अस्तेय ः अस्तेय म्हणजे चोरी करू नये.

४. अपरिग्रह ः अपरिग्रह म्हणजे मालमत्तेचा लोभ न करणे स्वार्थी वृत्तीचा त्याग

करावा.

५. ब्रह्मचर्य ः ब्रह्मचर्य म्हणजे मनामध्ये कामवासना बाळगू नये.

### इ) जैन धर्म महामंत्र

णमो अरिहंताणं

णमो सिद्धाणं

णमो आयरियाणं

णमो उवज्झायांण

णमो लोए सव्व साहूणं

एसोपंचणमोक्कारो, सव्वपावप्पणासणो

मंगला णं च सव्विसिं पडमम हवई मंगलं

| प्राकृत | अर्थ |
| --- | --- |
| णमो अरिहंताणं | अरिहंतो ना नमस्कार |
| णमो सिद्धाणं | सिद्धों ना नमस्कार |
| णमो आयरियाणं | आचार्यो ना नमस्कार |
| णमो उवज्झायांण | उपाध्यायों ना नमस्कार |
| णमो लोए सव्व साहूणं | साधुओं ना नमस्कार |
| एसोपंचणमोक्कारो,<br>सव्वपावप्पणासणो | हे णमोक्कार मंत्र सर्व<br>पापां चा नाश करणारे<br>आहे |
| मंगला णं च सव्वसिं<br>पडमम हवई मंगलं | तसेच सर्व मंगला मध्ये<br>प्रथम मंगल आहे |

णमोकार मंत्राला “पंच परमेष्ठि नमस्कार” असेही म्हणतात .

## ई) जैन धर्माचा झेंडा



## उ) जैन धर्माचे प्रतिक





## ऊ) जैन धर्माचे अहिंसा चिन्ह










# २. चोविस तिर्थंकर




जैन धर्म मध्ये ''२४ तिर्थंकर'' होवून गेले. तिर्थ ंकर म्हणजे असे व्यक्ती जे स्वःता तप करून, आत्मज्ञान (केवल ज्ञान) प्राप्त करतात ते. तिर्थंकर म्हणजे असे व्यक्ती जिने स्वःताचा राग, अभिमान, कपट, इच्छा या सर्वा वर विजय मिळवला ती व्यक्ती.



# १) तिर्थंकरांची थोडक्यात माहिती ः

| नंबर | तिर्थंकर | जन्म स्थान | जन्म नक्षत्र | आईचे नाव | वडिलांचे नाव | वैराग्य झाड | चिन्ह |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऋषभदेव जी | अयोध्या | उत्तराषाढा | मरूदेवी | नाभिराजा | वट |  बैल |
| २ | अजितनाथ जी | अयोध्या | रोहीणी | विजया | जितशत्रु | सर्पपर्ण |  हत्ती |
| ३ | सम्भवनाथ जी | श्रावस्ती | पुर्वाषाढा | सेना | जितारी | शाल |  घोडा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | अभिनंदन जी | अयोध्या | पुनर्वसु | सिद्धार्था | संवर | देवदार |  माकड |
| ५ | सुमतिनाथ जी | विनीतापूर | चित्रा | सुमंगला | मेघरथ | प्रिंयगु |  चकवा |
| ६ | पदम्प्रभ जी | कौशंबीपूर | विशाखा | सुसिमा | धारणाराजा | प्रिंयगु |  कमळ |
| ७ | सुपार्श्वनाथ जी | काशीनगरी | विशाखा | पृथ्वी | सुप्रतिष्ठ | शिरीष |  स्वस्तिक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | चंद्रप्रभ जी | चंद्रपुरी | अनुराधा | लक्ष्मणा | महासेन | नागतरू |  चंद्र |
| ९ | सुविधिनाथ जी | काकंधीपुरी | मूळ | जयरामा | सुग्रीव | शालवृक्ष |  मगर |
| १० | शीतलनाथ जी | भद्रिलापूर | पूर्वाषाढा | सुनंदा देवी | दृढरथ राजा | कलाश |  वृक्ष |
| ११ | श्रेयांसनाथ जी | सिंहपूरी | श्रवण | विष्णुश्री (नंदा) | विष्णुराज (विमल) | तिंदुक |  गेंडा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | वासुपुज्य जी | चंपापुरी | विशाखा | जयावती (विजया) | वसुपूज्य | पाठलतरू |  म्हैस |
| १३ | विमलनाथ जी | कांपिल्य | उत्तराषाढा | आर्यशर्मा | कृतवर्मा | जंबू |  डुक्कर |
| १४ | अनंतनाथ जी | आयोध्या | रेवती | लक्ष्मीमती | सिंहसेन | पिंपळ |  सायाळ |
| १५ | धर्मनाथ जी | रत्नपुरी | पुष्य | सुप्रभा | भानुराज | दिर्घपर्ण |  वज्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | शांतिनाथ जी | हस्तिनापूर | भरणी | ऐरादेवी | विश्वसेन | नंदीतरू |  हरीण |
| १७ | कुंथुनाथ जी | हस्तिनापूर | कृतिका | श्रीदेवी | सुरसेन | तिलक |  बकरा |
| १८ | अरहनाथ जी | हस्तिनापूर | रेवती | मित्रसेना | सुदर्शना | आम्र |  मासा (मीन) |
| १९ | मल्लिनाथ जी | मिथीलापुरी | अश्विनी | प्रभावती (रक्षता) | राजकुंभ | अशोक |  कुंभ |
| २० | मुनिसुव्रतनाथ जी | कुशाग्रपूर | श्रवण | सोमा | सुमित्र | चंपक |  कासव |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | नमिनाथ जी | मिथीलापुरी | अश्विनी | वर्मिला | विजयराज | बकुल |  निलकमल |
| २२ | नेमिनाथ जी | शोरिपुर | चित्रा | शिवा | समुद्रविजय | मेषश्रुंग |  शंख |
| २३ | पार्श्वनाथ | वाराणसी किंवा काशी | विशाखा | वामादेवी | विश्वसेन | धवल |  सर्प |
| २४ | महावीर जी | कुंडलपूर किंवा वैशाली | हस्त | त्रिशलादेवी | सिध्दार्थ राजा | शालवृक्ष |  सिंह |

## १) श्री ऋषभदेव श्री (आदिनाथ)

श्री ऋषभदेव जी जैन धर्मा चे प्रथम तीर्थंकर आहेत. श्री ऋषभदेव जी ना श्री आदिनाथ ही म्हटले जाते. त्यांची ऊंची ५00 धनुष (१५00 मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | अयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | उत्तराषाढा |
| आईचे नाव | ः | मरूदेवी |
| वडिलांचे नाव | ः | नाभिराजा |
| वैराग्य झाड | ः | वट |
| चिन्ह | ः | बैल |
| ऊंची | ः | ५00 धनुष (१५00 मीटर) |



श्री १००८ आदिनाथ भगवान



## २) श्री अजितनाथ जी

श्री अजितनाथ जी हे द्वितीय तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४५० धनुष (१३५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | अयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | रोहीणी |
| आईचे नाव | ः | विजया |
| वडिलांचे नाव | ः | जितशत्रु |
| वैराग्य झाड | ः | सर्पपर्ण |
| चिन्ह | ः | हत्ती |
| ऊंची | ः | ४५० धनुष (१३५० मीटर) |




श्री १००८ श्री अजितनाथ जी भगवान



## ३) श्री सम्भवनाथ जी

श्री सम्भवनाथ जी हे तीसरे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४०० धनुष (१२०० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | श्रावस्ती |
| जन्म नक्षत्र | ः | पुर्वाषाढा |
| आईचे नाव | ः | सेना |
| वडिलांचे नाव | ः | जितारी |
| वैराग्य झाड | ः | शाल |
| चिन्ह | ः | घोडा |
| ऊंची | ः | ४०० धनुष (१२०० मीटर) |



श्री १००८ संभवनाथ भगवान

# ४) श्री अभिनंदन जी

श्री अभिनंदन जी हे चौथे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३५० धनुष (१०५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | अयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | पुनर्वसु |
| आईचे नाव | ः | सिद्धार्था |
| वडिलांचे नाव | ः | संवर |
| वैराग्य झाड | ः | देवदार |
| चिन्ह | ः | माकड |
| ऊंची | ः | ३५० धनुष (१०५० मीटर) |





श्री १००८ श्री अभिनंदन भगवान

## ५) श्री सुमतिनाथ जी

श्री सुमतिनाथ जी हे पाचवे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३०० धनुष (९०० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | विनीतापूर |
| जन्म नक्षत्र | ः | चित्रा |
| आईचे नाव | ः | सुमंगला |
| वडिलांचे नाव | ः | मेघरथ |
| वैराग्य झाड | ः | प्रिंयगु |
| चिन्ह | ः | चकवा |
| ऊंची | ः | ३०० धनुष (९०० मीटर) |






श्री १००८ सुमतिनाथ भगवान

## ६) श्री पदम्प्रभ जी

श्री पदम्प्रभ जी हे सहावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २५० धनुष (७५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कौशंबीपूर |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |
| आईचे नाव | ः | सुसिमा |
| वडिलांचे नाव | ः | धारणाराजा |
| वैराग्य झाड | ः | प्रिंयगु |
| चिन्ह | ः | कमळ |
| ऊंची | ः | २५० धनुष (७५० मीटर) |






श्री १००८ पद्मप्रभ भगवान

## ७) श्री सुपार्श्वनाथ जी

श्री सुपार्श्वनाथ जी हे सातवे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २०० धनुष (६०० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | काशीनगरी |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |
| आईचे नाव | ः | पृथ्वी |
| वडिलांचे नाव | ः | सुप्रतिष्ठ |
| वैराग्य झाड | ः | शिरीष |
| चिन्ह | ः | स्वस्तिक |
| ऊंची | ः | २०० धनुष (६०० मीटर) |




श्री १००८ सुपार्श्वनाथ भगवान

## ८) श्री चंद्रप्रभ जी

श्री चंद्रप्रभ जी हे आठवे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १५० धनुष (४५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | चंद्रपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | अनुराधा |
| आईचे नाव | ः | लक्ष्मणा |
| वडिलांचे नाव | ः | महासेन |
| वैराग्य झाड | ः | नागतरू |
| चिन्ह | ः | चंद्र |
| ऊंची | ः | १५० धनुष (४५० मीटर) |





श्री १००८ चंद्रप्रभ भगवान

# ९) श्री सुविधिनाथ (पुष्पदंन्त) जी

श्री सुविधिनाथ जी हे नववे तीर्थंकर आहेत. त्यांना पुष्पदंन्त नावाने हि ओळखळे जाते. त्यांची ऊंची १०० धनुष (३०० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | काकंधीपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | मूळ |
| आईचे नाव | ः | जयरामा |
| वडिलांचे नाव | ः | सुग्रीव |
| वैराग्य झाड | ः | शालवृक्ष |
| चिन्ह | ः | मगर |
| ऊंची | ः | १०० धनुष (३०० मीटर) |





श्री १००८ पुष्पदंत भगवान

## १०) श्री शीतलनाथ जी

श्री शीतलनाथ जी हे दहावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ९० धनुष (२७० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | भद्रिलापूर |
| जन्म नक्षत्र | ः | पूर्वाषाढा |
| आईचे नाव | ः | सुनंदा देवी |
| वडिलांचे नाव | ः | दृढरथ राजा |
| वैराग्य झाड | ः | कलाश |
| चिन्ह | ः | वृक्ष |
| ऊंची | ः | ९० धनुष (२७० मीटर) |



श्री १००८ शीतलनाथ भगवान

# ११) श्री श्रेयांसनाथ जी

श्री श्रेयांसनाथ जी हे अकरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ८० धनुष (२४० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | सिंहपूरी |
| जन्म नक्षत्र | ः | श्रवण |
| आईचे नाव | ः | विष्णुश्री (नंदा) |
| वडिलांचे नाव | ः | विष्णुराज (विमल) |
| वैराग्य झाड | ः | तिंदुक |
| चिन्ह | ः | गेंडा |
| ऊंची | ः | ८० धनुष (२४० मीटर) |



श्री १००८ श्रेयांसनाथ भगवान

# १२) श्री वासुपुज्य जी

श्री वासुपुज्य जी हे बारावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ७० धनुष (२१० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | चंपापुरी |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |
| आईचे नाव | ः | जयावती (विजया) |
| वडिलांचे नाव | ः | वसुपूज्य |
| वैराग्य झाड | ः | पठलतरू |
| चिन्ह | ः | म्हैस |
| ऊंची | ः | ७० धनुष (२१० मीटर) |



श्री १००८ वासुपूज्य भगवान

## १३) श्री विमलनाथ जी

श्री विमलनाथ जी हे तेरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ६० धनुष (१८० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कांपिल्ल्य |
| जन्म नक्षत्र | ः | उत्तराषाढा |
| आईचे नाव | ः | आर्यशर्मा |
| वडिलांचे नाव | ः | कृतवर्मा |
| वैराग्य झाड | ः | जंबू |
| चिन्ह | ः | डुक्कर |
| ऊंची | ः | ६० धनुष (१८० मीटर) |



श्री १००८ विमलनाथ भगवान

# १४) श्री अनंतनाथ जी

श्री अनंतनाथ जी हे चौदावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ५० धनुष (१५० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | आयोध्या |
| जन्म नक्षत्र | ः | रेवती |
| आईचे नाव | ः | लक्ष्मीमती |
| वडिलांचे नाव | ः | सिंहसेन |
| वैराग्य झाड | ः | पिंपळ |
| चिन्ह | ः | सायाळ |
| ऊंची | ः | ५० धनुष (१५० मीटर) |



श्री १००८ अनंतनाथ भगवान

# १५) श्री धर्मनाथ जी

श्री धर्मनाथ जी हे पंधरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४५ धनुष (१३५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | रत्नपुरी |
| जन्म नक्षत्र | ः | पुष्य |
| आईचे नाव | ः | सुप्रभा |
| वडिलांचे नाव | ः | भानुराज |
| वैराग्य झाड | ः | दिर्घपर्ण |
| चिन्ह | ः | वज्र |
| ऊंची | ः | ४५ धनुष (१३५ मीटर) |




श्री १००८ धर्मनाथ भगवान

## १६) श्री शांतिनाथ जी

श्री शांतिनाथ जी हे सोळावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ४० धनुष (१२० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तिनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | भरणी |
| आईचे नाव | ः | ऐरादेवी |
| वडिलांचे नाव | ः | विश्वसेन |
| वैराग्य झाड | ः | नंदीतरू |
| चिन्ह | ः | हरीण |
| ऊंची | ः | ४० धनुष (१२० मीटर) |



श्री १००८ शांतिनाथ भगवान

# १७) श्री कुंथुनाथ जी

श्री कुंथुनाथ जी हे सतरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३५ धनुष (१०५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तिनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | कृतिका |
| आईचे नाव | ः | श्रीदेवी |
| वडिलांचे नाव | ः | सुरसेन |
| वैराग्य झाड | ः | तिलक |
| चिन्ह | ः | बकरा |
| ऊंची | ः | ३५ धनुष (१०५ मीटर) |



श्री १००८ कुंथुनाथ भगवान

# १८) श्री अरहनाथ जी

श्री अरहनाथ जी हे अठरावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ३० धनुष (९० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | हस्तीनापूर |
| जन्म नक्षत्र | ः | रेवती |
| आईचे नाव | ः | मित्रसेना |
| वडिलांचे नाव | ः | सुदर्शना |
| वैराग्य झाड | ः | आम्र |
| चिन्ह | ः | मासा (मीन) |
| ऊंची | ः | ३० धनुष (९० मीटर) |



श्री १००८ अरहनाथ भगवान

# १९) श्री मल्लिनाथ जी

श्री मल्लिनाथ जी हे एकोणिसावे तीर्थंकर आहेत.
त्यांची ऊंची २५ धनुष (७५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | मिथीलापुरी |
| जन्म नक्षत्र | ः | अश्विनी |
| आईचे नाव | ः | प्रभावती (रक्षता) |
| वडिलांचे नाव | ः | राजकुंभ |
| वैराग्य झाड | ः | अशोक |
| चिन्ह | ः | कुंभ |
| ऊंची | ः | २५ धनुष (७५ मीटर) |



श्री १००८ मल्लिनाथ भगवान

## २०) श्री मुनिसुव्रतनाथ जी

श्री मुनिसुव्रतनाथ जी हे विसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची २० धनुष (६० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | कुशाग्रपूर |
| जन्म नक्षत्र | ः | श्रवण |
| आईचे नाव | ः | सोमा |
| वडिलांचे नाव | ः | सुमित्र |
| वैराग्य झाड | ः | चंपक |
| चिन्ह | ः | कासव |
| ऊंची | ः | २० धनुष (६० मीटर) |



श्री १००८ मुनिसुव्रतनाथ भगवान

# २१) श्री नमिनाथ जी

श्री नमिनाथ जी हे एकविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १५ धनुष (४५ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | मिथीलापुरी |
| जन्म नक्षत्र | ः | अश्विनी |
| आईचे नाव | ः | वर्मिला |
| वडिलांचे नाव | ः | विजयराज |
| वैराग्य झाड | ः | बकुल |
| चिन्ह | ः | निलकमल |
| ऊंची | ः | १५ धनुष (४५ मीटर) |



श्री १००८ नमिनाथ भगवान

## २२) श्री नेमिनाथ जी

श्री नेमिनाथ जी हे बाविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १० धनुष (३० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | शोरिपुर |
| जन्म नक्षत्र | ः | चित्रा |
| आईचे नाव | ः | शिवा |
| वडिलांचे नाव | ः | समुद्रविजय |
| वैराग्य झाड | ः | मेषश्रुंग |
| चिन्ह | ः | शंख |
| ऊंची | ः | १० धनुष (३० मीटर) |



श्री 1008 श्री नेमिनाथ जी

## २३) श्री पार्श्वनाथ जी

श्री पार्श्वनाथ जी हे तेविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची १० धनुष (३० मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| जन्म स्थान | ः | वाराणसी (काशी) |
| जन्म नक्षत्र | ः | विशाखा |
| आईचे नाव | ः | वामादेवी |
| वडिलांचे नाव | ः | विश्वसेन |
| वैराग्य झाड | ः | धवल |
| चिन्ह | ः | सर्प |
| ऊंची | ः | १० धनुष (३० मीटर) |





# श्री १००८ पार्श्वनाथ भगवान

## २४) श्री महावीर जी

श्री महावीर जी हे चोविसावे तीर्थंकर आहेत. त्यांची ऊंची ६ धनुष (१८ मीटर) होती.

| | | |
|---|---|---|
| **जन्म स्थान** | ः | कुंडलपूर (वैशाली) |
| **जन्म नक्षत्र** | ः | हस्त |
| **आईचे नाव** | ः | त्रिशलादेवी |
| **वडिलांचे नाव** | ः | सिध्दार्थ राजा |
| **वैराग्य झाड** | ः | शालवृक्ष |
| **चिन्ह** | ः | सिंह |
| **ऊंची** | ः | ६ धनुष (१८ मीटर) |


ॐ
णमो अरिहंताणं, णमो सिद्धाणं
णमो आयरियाणं, णमो उवज्झायाणं
णमो लोए सव्वसाहूणं,
एसो पंच णमोक्कारो, सव्वपावप्पणासणो। मंगलाणं च सव्वेसिं, पढमं हवई मंगलं॥
चरित्र
सत्य
अचौर्य
ज्ञान
अहिंसा
अपरिग्रह
श्री १००८ महावीर भगवान
जगा आणि जगू द्या




# श्री १००८ महावीर भगवान

## १) श्री सम्मेद शिखरजी क्षेत्र

श्री सम्मेद शिखरजी ला पारसनाथ पर्वत असे ही म्हणतात . हे भारताच्या झारखंड राज्यामधील गिरीडीह जिल्हामध्ये छोटा नागपूर पठारावर असलेल्या १३५० मीटर उंच पर्वतामध्ये वसलेले सगळयात महत्वपुर्ण जैन तीर्थ क्षेत्र आहे . तिथे २४ तिर्थंकरांचे पादुका आहेत . येथे २४ पैकी २० तिर्थंकराना मोक्ष प्राप्ती झाली आहे .



## २) श्री पावापुरी क्षेत्र (महावीर निर्वाण स्थल)

श्री पावापुरी क्षेत्र हे राजगीर आणि बोधगया च्या जवळ भारताच्या बिहार राज्याचा नालंदा जिल्हा मधील शहर आहे . हे शहर कैमूर पर्वतामध्ये वसलेले आहे . येथे भगवान महावीर यांना मोक्ष प्राप्ती झाली आहे . येथील जलमंदिर हे प्रसिध्द मंदिर आहे .





## ३) श्री श्रवणबेळगोळ क्षेत्र

श्री श्रवणबेळगोळ क्षेत्र हे भारतामधील कर्नाटका राज्यातील हसन जिल्हा मधील विध्यंगिरी व चंद्रगिरी डोंगरा मध्ये वसलेले प्रसिध्द जैन तीर्थ क्षेत्र आहे. तिथे श्री गोमटेश्वर बाहुबली ची ५८ फुठ उंच मुर्ती असून, ही मुर्ती विध्यंगिरी डोंगरावर आहे.'





## ४) श्री मांगी-तुंगी

मांगी-तुंगी हे जैन तीर्थक्षेत्र आहे.ते महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील सटाणा तालुक्यात भिलवड गावाजवळ आहे. तेथे जैन धर्मीयांचे पहिले श्री ऋषभदेव जी (श्री आदिनाथ जी) यांची १०८ फुट उंच मुर्ती आहे.



## ५) श्री गिरनार

गिरनार हे जैन तीर्थक्षेत्र आहे.ते महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील सटाणा तालुक्यात भिलवड गावाजवळ आहे. तेथे जैन धर्मीयांचे पहिले श्री नेमिनाथ जी यांचे भव्य व संपन्न देवालय आहे.





## ६) श्री बाहुबली

बाहुबली हे जैन तीर्थक्षेत्र आहे.ते महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हातील हातकणंगले तालुक्यात कुंभोज गावाजवळ आहे. तेथे बाहुबलींची २८ फुट उंच मुर्ती आहे.



## ७) श्री कुंथलगिरी

कुंथलगिरी हे जैन तीर्थक्षेत्र महाराष्ट्रात आहे.ते महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हातील भूम तालुक्यात आहे. तेथे ११ मंदिरे आहेत. तिथे मुनिश्री देशभुषण व कुलभुषण यांची भव्य मंदिरे आहेत.





# महाराष्ट्रातील जैन धर्म

**- मिलिंद फडे, जैन सहयोग समिती**

सहसा जैन धर्म म्हटले की लोकांना गुजराती किंवा राजस्तानी व्यक्ती असेल असे वाटते. पण ते खरे नाही. जैन धर्माचा प्रसार भारताच्या सर्वच राज्यांत आहे. महाराष्ट्रातही जैन हा एक प्रमुख दर्म आहे.

जैन धर्म हा महाराष्ट्रामधील एक प्रमुख धर्म असून राज्यात चौथा सर्वात मोठा धर्म आहे. २०११ च्या भारतीय जगनगणेच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील जैन समाजाची लोकसंख्या १४,००,३४९ (१.२५%) आहे. महाराष्ट्रातील जैन हे राजस्थान मधील मारवाड प्रांत आणि गुजरात राज्यातून आलेले आहेत. महाराष्ट्रात एक अल्पसंख्य देशी मराठी जैन समुदाय आहे. राष्ट्रकूट आणि चालुक्यासारख्या राजवटींच्या काळात पहिल्या हजार वर्षांपासून महाराष्ट्रातील शासक जैन धर्माचे अनुयायी होते. प्राचीन वेरूळ लेणी परिसारात हिंदू आणि बौद्ध लेण्यांच्या बाजूला काही जैन लेणी आहेत.

वैदिक काळापासून भारतात यज्ञप्रधान ब्राह्मणी संस्कृतीबरोबरच अहिंसेवर आधरित श्रमणसंस्कृती अस्तित्वात होती, असे वैदिक वाङ्मयावरून दिसते. इंद्रियनिग्रह, परिग्रहत्याग, आत्मशुद्धी व अहिंसा या गोष्टींना महत्त्व देणारी ही श्रमणसंस्कृती होती. बौद्ध व जैन हे श्रमणसंस्कृतीचे अनुयायी होत. अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व परिग्रहत्याग ही व्रते श्रमणसंस्कृतीत मुख्य मानली होती.

जैनांचे धार्मिक वाङ्मय : जैनांचे वाङ्मय मूलतः प्राकृत भाषेत आहे. महावीरांनी आपल्या धर्माचा उपदेश अर्धमागधी या प्राकृत जनभाषेत केला. श्वेतांबर जैनांचे ४५ आगमग्रंथ अर्धमागधी भाषेतच आहेत. दिगंबर पंथाचे आगमग्रंथ ‘जैन शौरसेनी’ प्राकृत भाषेत आहेत. कालांतराने जैन आचार्यांनी ग्रंथरचनेसाठी संस्कृत भाषेचा अवलंब केला. आचार्य उमास्वातीने लिहिलेला तत्त्वार्थाधिगमसूत्र हा जैनांचा आद्य संस्कृत ग्रंथ होय. आठव्या शतकात आचार्य हरिभद्रसूरीने संस्कृतात टीका लिहिण्याचा पायंडा पाडला. जिनसेन आणि गुणभद्र या दिगंबर आचार्यांनी महापुराण संस्कृतात लिहिले. याशिवाय संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांत जैनांनी विपुल कथावाङ्मय निर्माण केले तसेच आपल्या लौकिक व नैतिक ग्रंथनिर्मितीकरिता जैनांनी तमिळ व कन्नड या भाषांचाही उपयोग केला [⟶ जैन साहित्य].

पंचपरमेष्ठी : मोक्षमार्ग अनुसरणाऱ्या साधकाचे त्यांच्या प्रगतीला व पदाला अनुसरून पाच प्रकार केलेले आहेत. हे पाचही प्रकारचे

साधक संसारी जीवांना मार्गदर्शक आणि आदर्शभूत असल्याने त्यांना जैन धर्मामध्ये ‘पंचपरमेष्ठी’ म्हणतात. साधू, उपाध्याय, आचार्य, अर्हत् आणि सिद्ध हे पंचपरमेष्ठी होत. साधू, भिक्षू, तपस्वी, मुनी, श्रमण यांचा अर्थ वेगवेगळा होत असला, तरी त्यांचा उपयोग समानार्थाने केला जातो. संघात राहून साधू शिक्षण घेत असतो. उपाध्याय हे स्वतः शिकतात आणि शिकवितातही. आचार्य हे संघाचे प्रमुख असतात ते नवीन साधूंना दीक्षा देतात आणि नियमन करतात [⟶ जैन संघ]. विद्वान व ज्येष्ठ साधूंनाच आचार्यपद दिले जाते. अर्हत् हे केवलज्ञानी व सर्वज्ञ असतात. सिद्ध मुक्तीला पोहोचलेले कृतकृत्य असतात. पंचपरमेष्ठींच्या नावांचे चिंतन पुण्यकारक समजले जाते. त्यांना ज्यात नमस्कार केलेला आहे, तो ‘पंचनमस्कारमंत्र’ जैन धर्मीयांना अतिशय पवित्र असून सर्व पापांचा नाश करणारा आहे.

जैनांचा निरीश्वरवाद : ईश्वराशिवाय धर्म असू शकतो, ही गोष्ट सामान्य माणसाला विचित्र वाटते. कारण ‘धर्म म्हणजे ईश्वरप्रार्थना’, हे समीकरण त्याच्या मनात ठसलेले असते. मराठीत आपण देवधर्म हा समास करून देव व धर्म यांचा संबंध प्रगट करतो परंतु ईश्वर सृष्टिकर्ता आहे, तोच जीवांना त्यांच्या कर्मानुसार चांगली–वाईट फळे देतो, ही कल्पना जैन धर्माला मान्य नाही. सृष्टी ही कोणी केलेली नाही व कोणी तिचा नाशही करीत नाही. प्रत्येक जीवाला त्याच्या कर्मानुसार आपोआप फळ मिळत असते, अशी विचारसरणी जैन धर्माची आहे.

जैन धर्म सृष्टिकर्ता ईश्वर मानीत नसला, तरी पापपुण्य, स्वर्गनरक व बंधमोक्ष मानतो आणि मोक्षप्राप्तीसाठी इंद्रियनिग्रह व्रताचरण, ध्यानधारणा इ. गोष्टी आचरावयास आग्रहाने सांगतो.

असे जरी असले, तरी ‘देव’ किंवा ‘ईश्वर’ नावाची वस्तू जैन धर्मात नाही असे नाही. कर्माचा नाश करून केवलज्ञानप्राप्ती व मोक्षप्राप्ती करून घेतलेला प्रत्येक जीव ‘परमात्मा’च आहे व तो आदर्श व पूज्य असल्याने त्यालाच जैन ईश्वर म्हणतात. त्याच्या गुणांची प्राप्ती होण्यासाठी, त्याला आदर्श म्हणून पुढे ठेऊन, त्याची पूजाअर्चा आणि भक्ती करणेही जैन धर्माला मान्य आहे. भारतवर्षामध्ये सगळीकडे तीर्थंकरांची भव्य मंदिरे प्राचीन काळापासून अस्तित्वात असून मोठ्या वैभवाने त्यांच्या मूर्तींची तेथे पूजा केली जाते. श्रवणबेळगोळ येथे सु. १८ मी. उंचीची मूर्ती असलेल्या गोमटेश्वराचा मार्च १९६७ मध्ये महामस्तकाभिषेक झाला. त्या समारंभाला सु. ६ लाख लोक हजर होते.

कर्मवाद : भारतातील चार्वाक वा लोकायतदर्शनाशिवाय सर्व दर्शनांनी कर्मवादाचा पुरस्कार केलेला आहे. ‘करावे तसे भरावे’ इ. वाक्प्रचार कर्मवाद सामान्य रीतीने समाजाच्या अगदी खालील थरापर्यंत कसा पोहोचलेला आहे, ही गोष्ट सिद्ध करतात. आपले सुखदुःख आपल्या कर्माचे फल आहे, हे बहुतेकांना पटल्यासारखे दिसते. ईश्वरसुद्धा कर्मानुसारच फल देतो, असे ईश्वरवादी सांगतात.

ईश्वरच सर्व काही करतो, असे म्हणण्यात काही विसंगती दिसते. जगात जे अमंगल आहे, दुष्ट आहे, त्याज्य आहे, पाप आहे त्याची जबाबदारी ईश्वरावर नाही तर कोणावर ? जगातील विषमतेचा खुलासा कसा करावयाचा ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे ⇨कर्मवाद पुष्कळ समाधानकार रीतीने देऊ शकतो. म्हणूनच तो इतका लोकरूढ झालेला आहे.

कर्मवाद सर्व धर्मांना मान्य असला आणि त्यांनी त्याचा पुरस्कार केला असला, तरी त्याची चर्चा जैन धर्माने जितक्या सूक्ष्म रीतीने व विस्तारपूर्वक केलेली आहे, तशी चर्चा अन्यत्र आढळत नाही. जैन कर्मवाद आपल्या कर्माची संपूर्ण जबाबदारी व्यक्तीवर टाकतो व तेथे सृष्टिकर्त्या ईश्वराला मुळीच स्थान नाही. या विषयावर अनेक ग्रंथ आहेत. शिवाय प्रत्येक महत्त्वाच्या ग्रंथात त्या विषयाची चर्चा आहेच.महाबंध नावाचा ४०,००० श्लोकांचा प्राचीन ग्रंथ नुसत्या कर्मबंधाचे वर्णन करतो. कर्मसिद्धांत हा जैन धर्माचा पाया आहे.

अहिंसामूलक धर्म : जैन नीतिशास्त्र जैन तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. कर्मनाशाशिवाय मुक्ती नाही. म्हणून जैनांनी कर्मनाश करण्याच्या दृष्टीने नीतीची आखणी केलेली आहे. गृहस्थधर्म आणि साधुधर्म हे त्या नीतीचेच दोन भाग आहेत. हे दोन्ही धर्म एका दिशेनेच जातात.

गृहस्थधर्म हा सौम्य केलेला साधुधर्म आहे. साधूला सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करावा लागतो, तर गृहस्थाला स्थूलमानाने हिंसेचा त्याग करावयाचा असतो. तो आपल्या निर्वाहासाठी एखादा योग्य उद्योग करू शकतो आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या अगर देशाच्या रक्षणासाठी शस्त्रही धारण करू शकतो. साधू असत्य भाषण सर्व प्रकारांनी वर्ज्य करतो परंतु गृहस्थ सत्याचे तरतमभाव करू शकतो अचौर्यव्रत करणाऱ्या साधूला कोणतीही वस्तू दिल्याशिवाय घेता येणार नाही. गृहस्थाच्या बाबतीत पुष्कळ सवलत आहे. त्याला चोरी करता येणार नाही पण मित्राच्या घरातील स्वतःच्या मालकीची वस्तू त्याला न विचारता आणता येईल. साधूला कडक रीतीने ब्रह्मचर्य पाळावे लागते पण गृहस्थाचे या बाबतीतले व्रत आहे ‘स्वदारसंतोष’. साधूला कोणताही परिग्रह म्हणजे घरदार, सामान, नोकरी, जमीनजुमला इ. ठेवता येणारी नाही पण गृहस्थाला विशिष्ट मर्यादेपर्यंत हे सर्व ठेवता येईल. लोभाचा त्याग हा अपरिग्रहामध्ये महत्त्वाचा भाग आहे आणि लोभाचा त्याग म्हणजे पुन्हा अहिंसा आलीच. सूर्यास्तानंतर न जेवणे, पाणी गाळून पिणे, मदिरात्याग, मितभाषण, जीवजंतू तोंडात जाऊ नयेत म्हणून मुखपट्टी बांधणे इत्यादी. साधूच्या आणि गृहस्थाच्या सर्व नियमांचा विचार केला, तर त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपात अहिंसाच सांगितली आहे, असे दिसून येईल [⟶ अहिंसा].

इतिहास व प्रसार : महावीर तीर्थंकरांच्या वेळी जैन धर्माचा प्रसार जरी भारताच्या पूर्वेकडील देशांमध्ये झालेला होता, तरी नंतरच्या शतकांमध्ये जैन धर्माचा गुरुत्वकेंद्र पश्चिम दिशेला सरकत गेला आणि काही काळ तरी तो गुजरातचा राजधर्म बनला. चंद्रगुप्त राज्य करीत असताना बिहार प्रांतात भयंकर दुष्काळ पडला होता. त्या वेळी जैन संघाचे प्रमुख आचार्य ⇨भद्रबाहू आपल्या काही अनुयायांसह दक्षिणेत म्हैसूरकडे गेले आणि तिकडे त्यांनी जैन धर्माचा प्रसार केला. यामुळे द. भारतामध्ये दिंगबर पंथीय जैनांची संख्या इतर प्रांतापेक्षा अधिक आहे.

महाराष्ट्रात व कर्नाटकात आढळून येणाऱ्या जुन्या मंदिरांवरून व शिलालेखांवरून असे दिसून येईल, की या भागांमध्ये जैन धर्माला राजाश्रय होता व जैन धर्मीयांची संख्याही पुष्कळ होती. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून जवळ जवळ एक हजार वर्षे गंग वंशीय राजे दक्षिणेत राज्य करीत होते. जैन धर्माचा हा सुवर्णकाळ होय. या काळत समंतभद्र, पूज्यपाद आणि ⇨अकलंकदेव यांनी दक्षिणेत जैन धर्माचा प्रसार केला. गंगराज चौथा राछमल्ल याचा सेनापती चामुंडराय याने नेमिनाथाचे मंदिर बांधविले व प्रसिद्ध ⇨ गोमटेश्वराच्या मूर्तीची स्थापना केली. राष्ट्रकूट वंशात उत्पन्न झालेला पहिला अमोघवर्ष (सु. ८०८–८०) या राजाने आदिपुराणकर्ते ⇨आचार्य जिनसेन यांचे शिष्यत्व पतकरले होते. चालुक्य वंशातील राजांनीसुद्धा जैन धर्माला

चांगला आश्रय दिलेला होता. काहींनी जिनमंदिरे बांधविली आणि जैन कवींना राजाश्रय दिला.

यानंतरच्या काळात दक्षिणेमध्ये जैन धर्माला उतरती कळा लागली. जैन धर्मीयांमध्ये अनेक पंथ, उपपंथ, जाती, पोटजाती निर्माण झाल्या.

सद्यःस्थिती : जैन धर्मीयांची संख्या १९०१ च्या जनगणनेप्रमाणे १३,३४,१४० होती १९७१ च्या जनगणनेप्रमाणे ती २६,०४,६४६ झाली आहे.

वैयक्तिक धर्माचरणाच्या बाबतीत जैन समाज अगदी काटेकोरपणे वागणारा आहे पण त्यांची सामाजिक वागणूक, सण, सार्वजनिक उत्सव इ. गोष्टी हिंदूंप्रमाणेच आहेत. गणपती, सत्यानारायण, दत्त इ. हिंदू देवतांना ते भजतात. त्यांच्या जन्म-विवाहादी संस्कारांचे पौरोहित्य हिंदू ब्राह्मणांकडूनच प्रायः केले जाते. इतकेच नव्हे, तर जैन मंदिरांतील पुजारीही (भोजक) पुष्कळदा ब्राह्मणच असतात. जैन मूर्तींच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी ब्राह्मणांना भोजन व दक्षिणा दिल्याचा उल्लेख खारवेल या जैन पंथी कलिंगराजाच्या शिलालेखात येतो. त्याने राजसूय यज्ञ केल्याचेही त्यात म्हटले आहे.

व्यापार, विद्यार्जन या निमित्ताने जैन मनुष्य जेथे जाईल तेथील लौकिक रीतिरिवाज तो अनुसरतो. ज्ञानलालसा, सत्य, दान, शील,

सद्भाव इ. गोष्टींवर जैनांचा भर असल्यामुळे त्यांच्यात साक्षरताप्रसार बराच झाला असून गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे. कारखाने, उद्योगधंदे, व्यापार, विद्या व सभ्यता यांमुळे जैनांनी भारतीय समाजात आपले वैशिष्ट्य टिकवून प्रभाव पाडला आहे.

सुरुवातीला पाश्चिमात्य अभ्यासकांना बौद्ध धर्म व जैन धर्म यांमध्ये अनेक बाबतींत इतके साम्य आढळून आले, की जैन धर्म हा बौद्ध धर्मातून उत्पन्न झालेला असावा, अशी त्यांची चुकीची कल्पना झाली. ही कल्पना अजून समूळ नाहीशी झालेली नाही परंतु ⇨हेर्मान याकोबीने जैन आगमांची प्राचीनता सिद्ध करून जैन धर्म बौद्ध धर्माहून वेगळा असून त्याहून प्राचीन आहे, हे सप्रमाण दाखवून दिले.

जैनांचे चोविसावे तीर्थंकर ⇨वर्धमान महावीर  ही ऐतिहासिक व्यक्ती आहे, याबद्दल आता शंका उरलेली नाही. महावीरांपूर्वी होऊन गेलेल्या ⇨पार्श्वनाथांनी उपदेशिलेल्या धर्माचे आचरण स्वतः महावीर व त्यांचे आईवडील करीत होते. बुद्धापूर्वी जैन धर्म अस्तित्वात होता, हे दाखविणारे अनेक उल्लेख बौद्ध व जैन वाङ्मयात आढळतात.

जैन धर्म व बौद्ध धर्म : जैन धर्म आणि बौद्ध धर्मातील साम्यदर्शक गोष्टी अशा आहेत : दोन्ही धर्मांचे प्रवर्तक मगध देशातील क्षत्रिय होते. दोघाही धर्मप्रवर्तकांना जिन, अर्हत्, बुद्ध, सुगत, तथागत इ. समान

उपाधींनी संबोधण्यात येत असे. दोन्ही धर्मांचे अनुयायी आपल्या धर्मप्रवर्तकांना 'देव'समजून व त्या देवांच्या मूर्ती मंदिरात स्थापन त्यांची पूजा करतात चैत्य वा स्तूप उभारून त्यांत त्यांच्या मूर्तींची स्थापना करतात. चोवीस ⇨तीर्थंकर होऊन गेले असे जैन मानतात, तर पंचवीस बुद्ध होऊन गेले असे बौद्ध मानतात. या जगाचा इतिहास सांगताना जैन धर्म आणि बौद्ध यांची कल्पाची व युगाची कल्पना अवाढव्यपणात समान आहे. या दोन धर्मांतील साम्य असे : अहिंसा परमधर्म, यज्ञखंडन, वेदप्रामाण्य व जातिसंस्था मोक्षमार्गात न मानणे कर्मसिद्धांत, भिक्षुसंघ, लोकभाषेत उपदेश, मोक्षाचा सर्व मानवांस अधिकार इत्यादी.

जैन आणि बौद्ध धर्मांतील प्रमुख तत्त्वांमध्ये मौलिक फरकही आहे. बौद्धांची पंचस्कंधांची कल्पना जैन कल्पनेहून भिन्न आहे. जैन पृथ्वीकाय, अप्काय, तेजकाय, वायुकाय व वनस्पतिकाय असे पाच प्रकारचे स्थावर जीव मानतात. बौद्धांमध्ये अशा प्रकारची कल्पना नाही. मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान व केवलज्ञान हे ज्ञानप्रकार बौद्धांत नाहीत. बौद्ध 'निर्वाण' आणि जैन 'मुक्ती' या कल्पना भिन्न आहेत.

महाराष्ट्रातील दिगंबर जैनक्षेत्रे



आसेगांव

आष्टा (कासार)

अन्तरिक्ष पार्श्वनाथ

भातकुली जैन

दहीगाँव

धरणगाँव

एलोरा (वेरूल)

गजपंथा

जटवाड़ा

कचनेर

कारंजा (लाड़)

कौडण्यपुर

केसापुरी-बीड़

कुम्भोज बाहुबली

कुण्डल

कुंथलगिरि

कुन्थुगिरि

मांडल

मांगीतुंगी

नाईचाकुर

नंदीश्वर-पंचालेश्वर

नवागढ़ (उखलद)

नेमगिरि, जिंतूर

पैठण

पोदनपुर (बोरीवली)

रामटेक

सावरगाँव (काटी)

शिरड़ शहापुर

तेर

विजय गोपाल

# चातुर्मास

चातुर्मास म्हणजे आपल्या घरातील मोठा आनंदाचा क्षण असे जैन समाज बांधव मानतात. त्यासाठी रोजच्या व्यापातून वेळ काढून मुनीश्रींचे दर्शन घेणे, प्रवचने ऐकणे याला अनन्यसाधारण महत्त्व देतात. महाराष्ट्र आणि जैन संस्कृती यांचे अजोड, पुरातन नाते आहे. अहिंसा, अनेकांत वाद, शाकाहार अशा उदात्त मानवी मूल्यांचा प्रभाव जैन संस्कृतीमुळे वाढला, असे जैन बांधव अभिमानाने सांगतात.

चातुर्मास पर्वाची सारे जैन आतुरतेने वाट बघत असतात. जैन धर्मात या चार महिन्यांच्या कालावधीस म्हणजेच चातुर्मास पर्वास अनन्यसाधारण महत्त्व आहे. जैन धर्मकल्पनेनुसार चातुर्मास आषाढ शुक्ल चतुर्दशीला सुरू होतो आणि कार्तिक पौर्णिमेला सांगता होते. या कालावधीत जैन साधू-साध्वी एकाच ठिकाणी चार महिने राहून, धर्मआराधना आणि साधना करतात. पावसाळ्याच्या या चार महिन्यांत चातुर्मास वर्षावास पर्व साजरे केले जाते.

जैन धर्म अहिंसेवर आधारित आहे. पावसाळ्यातील चार महिन्यांत अनेक प्रकारचे कीटक आणि न दिसणारे सूक्ष्मजीव सर्वाधिक सक्रिय होतात, असे जैन संस्कारांत मानले जाते. या कालावाधीत मनुष्याच्या चालण्या-फिरण्याने या सूक्ष्मीजीवांना धोका पोहाचू शकतो,

असा समज आहे. या जीवांना त्रास होऊ नये आणि जैन साधू-साध्वींकडून हिंसा होऊ नये, यासाठी या चातुर्मास काळात ते एकाच जागी मुक्काम करून धर्मसाधना, धर्म आराधना, संयम साधना आणि सर्वसामान्यांच्या आत्मकल्याणासाठी प्रेरणादायी प्रवचने देतात.

वर्षभर हे जैन साधू-साध्वी देशभर अनवाणी चालून, धर्मजागरण आणि समाजप्रबोधनाचे काम करतात. चातुर्मास काळात जैन धर्मांचे प्रमुख संवत्सरी महापर्व म्हणजेच आठ दिवसांचे पर्युषण पर्व आधारणेसह साजरे केले जाते. वर्षभर जे जैन भाविक आपल्या रोजच्या जीवनात काही बाबींचे पालन करू शकत नाहीत, ते सर्व या आठ दिवसांच्या पर्युषण पर्वात पाळले जाते. रात्री भोजन न घेणे, ब्रह्मचर्याचे पालन, स्वाध्याय, जप-तप, मंगल प्रवचनांचा लाभ आणि साधू-संतांची सेवा याद्वारे जैन संस्कारांचे आचरण करीत जीवन फलदायी करण्याचा बांधव प्रयत्न करतात. चातुर्मासाच्या या चार महिन्यांच्या कालावधीत सर्व बांधवांना विशेषतः, युवक आणि महिलांना जैन साधू साध्वी जैन संस्कारांचे कथन करतात. त्यातून धर्म जागरण आणि समाजप्रबोधनही केले जाते. स्वतःची ओळख प्राप्त करून घेणे हा पर्युषण पर्वाचा हेतू आहे.

चातुर्मास पुण्याप्रमाणेच देशातील अनेक शहरांत विविध साधूसाध्वींच्या उपस्थितीत सुरू आहे. आपल्या शहरातही अनेक संस्था, समाज संघटकांनी सत्संग, संस्कार शिबिरे आयोजित केली आहेत.

जैन धर्म हा जगातील एक प्रमुख धर्म असून, त्याला हजारो वर्षांची परंपरा आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हा या धर्माचा गाभा आहे. जैन धर्म श्वेतांबर आणि दिगंबर या दोन मुख्य पंथांमध्ये विस्तारला आहे. यांच्या परंपरांमध्ये काही लहान-मोठे बदल आढळून येतात. श्वेतांबर जैनांमध्ये तेरापंथी मूर्ती पूजक, डेरावासी आणि स्थानकवासी असे तीन उपपंथ आहेत. यातील तेरापंथी मूर्ती पूजक हे मूर्तीचे पूजन करतात, त्यासाठी जल अभिषेक करतात. डेरावासीदेखील मूर्ती पूजक आहेत. मात्र, ते पंचांमृताचा अभिषेक करतात. स्थानक पंथात मूर्तीपूजन नाही. धार्मिक कार्यक्रम होतात; पण मूर्तीची पूजा होत नाही. दिंगबर जैनांमध्ये नग्न साधू त्यांचे श्रद्धास्थान आहेत.

चातुर्मासाचे पालन हे बहुतांश धर्म आणि समाजात केले जाते; पण प्रत्येकाचा कालावधी, त्यामागील धार्मिक कारणे, आख्यायिका आणि श्रद्धास्थाने, नियम वेगवेगळे आहेत. जैन समाजाचे पर्युषण पर्वदेखील उपपंथानुसार वेगळ्या दिवशी सुरू होते. पहिल्यांदा स्थानकवासींचे पर्युषण पर्व सुरू होते. ते आठ दिवसांचे असते. दुसऱ्या दिवशी तेरापंथी जैनांचे पर्युषण सुरू होते. दिगंबर जैनांचे पर्युषण पर्व गणेशोत्सवाबरोबर सुरू होते आणि ते गणेश जयंतीनुसार १० किंवा ११ दिवसांचे असते. या काळात पूर्वजांनी दिलेल्या आदेशांनुसार प्रत्येक सर्व नियमांचे पालन केले जाते.

भारतात आज जैन समाजाची संख्या दोन कोटींपेक्षा जास्त आहे. यातील श्वेतांबर जैन बांधव व्यवसायानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यात विखुरले असले, तरी ते मूळचे राजस्थान आणि गुजरातचे! कामासाठी शेकडो वर्षांपूर्वी ते बाहेर पडले. दिगंबर जैन हे सुरुवातीपासून देशाच्या कानाकोपऱ्यात वसले आहेत. ते त्या मातीतच जन्माला आले आणि तिथेच राहिले आहेत. दिगंबर जैन मुख्यतः शेतकरी! तरुणसागर महाराज, आचार्य रजनीश, पश्चिम महाराष्ट्रातील कर्मवीर भाऊसाहेब पाटील हे सगळे मूळचे शेतकरी कुटुंबातले. देशात जैन धर्मातील सर्वाधिक श्रीमंत वर्ग हा श्वेतांबर जैन; कारण त्यांनी सुरुवातीपासून व्यवसाय क्षेत्रच निवडले आहे. देशात राहणाऱ्या जैनांमध्ये दिगंबर जैनांचे प्रमाण अधिक म्हणजेच ६५ टक्के, तर श्वेतांबर जैनांचे प्रमाण ३५ टक्के आहे. आदिवासी समूहातही दिगंबर जैन समाज आहे; पण चातुर्मासाचा कालावधी सर्वच जैनांसाठी सारखाच महत्त्वाचा आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील जैन चातुर्मासाबद्दल संवेदनशील असून, या काळातील सर्व नियमांचे प्रामाणिकपणे पालन करतात. पर्युषण पर्वाच्या शेवटच्या दिवशी कुटुंबातील प्रत्येक जण मंदिरात, स्थानकात जाते. या वर्षीही पुण्यात चातुर्मासानिमित्त विविध स्थानके आणि मंदिरांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम, प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे.

## पर्युषण पर्वातील दशधर्मांचे पालन...

### डॉ. रावसाहेब पाटील, जैन धर्म अभ्यासक

आत्मीय गुणांची पूजा हे जैन धर्माचे खास वैशिष्ट्य! जैन संस्कृती, परंपरा आणि संस्कार यांची अनमोल देणगी म्हणजे पर्युषण पर्व. दशधर्माच्या स्वाध्यायासह हे दशधर्म जीवनात उतरविण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात अलौलिक सुख, समृद्धी आणि आत्मनिष्ठा प्राप्त होते.

क्षमा धर्म : आचारापेक्षा गुणात्मक असलेला जैनधर्म हा १० प्रकारांत सामावला आहे. क्षमा हा आत्म्याचा मुख्य गुण आहे; पण क्रोधामुळे हा क्षमागुण अवगुंठीत होतो. षड्रिपूतील शक्तीमान क्रोधाला जी जिंकू शकते, ती क्षमा. क्रोध अपयशाकडे ओढून नेतो, तर क्षमा ही नदीसारखी आहे. नदी जशी सर्व घाण स्वीकारते; पण अस्वच्छ होत नाही. ती स्वच्छ राहून इतरांना पाणी देऊन तृप्त करते. क्षमा हे आपले जगण्याचे कवच आहे.

मार्दव धर्म : मान, दुरभिमान, अहंकार हा माणसाचा मोठा शत्रू आहे. अहंकार माणसाला हीन करतो. ही कटुता त्याग करणे म्हणजेच मार्दव (मृदुता), नम्रता आणि विनय हे गुण आत्मसात करणे. अहंकाराने

मोठी झाडे मोडून पडतात, तर नम्र होणारी, वाकणारी लव्हाळी मात्र सुखरूप राहते. आयुष्यात यश प्राप्त करण्यासाठी मुदृता-मार्दवच धारण केले पाहिजे.

आर्जव धर्म : आर्जव म्हणजे ऋजुता, सरलता, मनात जे असेल तेच वचनात आणणे, तशीच कृती करणे. कपटाचा अभाव म्हणजे आर्जव! आत्माच्या हिताचा विचार करणाऱ्यांनी आर्जव धर्माचा आश्रय घेतला पाहिजे. आर्जव धर्म मोक्षाकडे नेणारा आहे. ज्याचे मन सरळ असेल, त्याच्या जवळ फारसे धन नसले, तरी तो सुखासमाधानाने जगतो.

उत्तम शौच धर्म : शौच म्हणजे शुचिता, पावित्र्य, मांगल्य. मलिन शरीराला आपण स्नान करून स्वच्छ करतो. चांगल्या कपड्यांनी नटवतो; पण मनाला निर्मल ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे आपण विसरतो. मन स्वच्छ असल्याशिवाय शारीरिक शुद्धतेला काही अर्थ नाही. मन पवित्र, तर शरीरही पवित्र!

सत्य धर्म : सर्वच धर्मांत सत्याला महत्त्वाचे स्थान आहे. सत्य वचनाने मनुष्याचे जीवन उज्ज्वल होते. सत्य अतिशय दुर्लभ आहे; पण ते एकदा प्राप्त झाले, की मनुष्य त्याला सोडत नाही. त्याशिवाय राहू

शकत नाही. असत्य बोलणाऱ्यावर कोणी विश्वास ठेवत नाही. असत्य फार काळ टिकत नाही. जो प्राणी सत्याचा आश्रय घेतो, त्याला जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकावे लागत नाही. आजचे जग असत्याने भरले आहे; पण आज ना उद्या सत्याचा जय झाल्याशिवाय राहणार नाही.

उत्तम संयम धर्म : पंचेंद्रियांवर संयम मिळविणे अतिकठीण आहे; पण असाध्य नाही. विद्यार्जन, अर्थार्जन, घरसंसार या सर्वांच्याच बाबतीत संयम आवश्यक आहे. एवढेच नाही, तर वाणीवरही संयमाची गरज आहे. योग्य वेळी ब्रेक लावला नाही, तर अपघात घडतो. त्याचप्रमाणे मानवी जीवनाच्या या गाडीला इंद्रियांच्या मनाच्या आणि कषायांना संयमाच्या ब्रेकची गरज आहे. आपल्या गरजा सीमित करणे, मर्यादित ठेवणे, कोठे थांबायचे हे कळणे म्हणजे संयम.

त्याग धर्म : त्याग ही भारतीय संस्कृतीची मोठी देणगी आहे. तृष्णेपासून मुक्ती म्हणजे त्याग. त्याग हा प्रकाशाकडे नेणारा आहे, तर तृष्णा अंधःकाराकडे नेणारी आहे. भारतीय संस्कृती ही त्यागमय आहे. स्वार्थीपणाचा त्याग करा. एक तीळ सर्वांनी खा, हे संस्कृती सांगते. दान करण्याचा संदेश देते. आपले जे आहे, त्यात इतरांना सहभागी करून घ्या, असे सांगते.

आकिंचन्य धर्म : ज्ञान-दर्शनमय स्वरूपापेक्षा दुसरे काहीही माझे नाही, ही भावना म्हणजे आकिंचन्य धर्म! आत्मा शरीरापेक्षा भिन्न आहे. तो ज्ञानमय, अनुपम, स्पर्श- रस- गंध- वर्णरहित, ज्ञानानंदाने परिपूर्ण आहे. हे शरीर म्हणजे मी नाही. मी केवळ या सर्वांचा ज्ञाता आहे. शरीर ही मला मिळालेली देणगी आहे. त्यामुळे कर्तव्य करा; पण त्यात अडकू नका असे आकिंचन्य धर्म सांगतो.

ब्रह्मचर्य धर्म : सर्व विषयांचा मोह सोडून ज्ञायक स्वभावी आत्म्यात लीन होणे म्हणजे ब्रह्मचर्य! ब्रह्मचर्य धारण करण्यासाठी क्षमता असलेला मनुष्य सहजच इंद्रियावर आणि कषायावर विजय मिळवू शकतो. सर्व १० धर्मांत श्रेष्ठ असा ब्रह्मचर्य धर्म आहे. स्त्री सुखाचा वा पुरुष सुखाचा आस्वाद घेण्यासाठी एक सामाजिक व्यवस्था म्हणजे विवाह. त्या विवाहातील मांगल्य, पावित्र्य जपून एक नवी पिढी आपण घरात आणतो. वैवाहिक संबंध उत्तम राहावेत, अनुरागी राहावेत आणि परस्परांच्या आत्मविकासासाठी उपयोगी पडावेत, यासाठी ब्रह्मचर्याची साधना आवश्यक आहे. तुच्छ आणि हीन कामवासनेला बळी पडून, आपला गौरव, आपली अस्मिता आणि लौकिक, साधना नष्ट करण्यासारखे महापाप नाही. उत्तम ब्रह्मचर्य हे जीवननौकेचा सुकाणू होय.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.


मंडळी!

वाचायला तर हवंच!

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in